# नियमीत दिवाणी मुकदमा क्र.१२५/२०१२ मधील
# निशाणी क्र.११२ वर आदेश
**CNR-MHLA110001102015**

---

०१. सदरचा अर्ज वादींनी दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. सदर अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, सदर प्रकरणातील दाव्यामधील वादग्रस्त मिळकतीच्या चतुःसीमेमध्ये अर्जात नमूद केल्याप्रमाणे दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपामध्ये बदल होणार नाही. त्यामुळे अर्जात नमुद केल्याप्रमाणे मुळ दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी देण्याची वादीने शेवटी विनंती केलेली आहे.

०२. सदर अर्जाला प्रतिवादींनी म्हणणे दाखल करुन तीव्र विरोध दर्शविला आहे.

०४. सदर प्रकरणातील पक्षकारांतर्फे विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. तसेच प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले.

०५. सदर प्रकरणातील कागदपत्रांच्या अवलोकनावरुन याठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते की, सदरचा दावा वादींनी मिळकतीचा कब्जा मिळण्याकरीता व दरम्यानच्या उत्पन्नाकरिता दाखल केलेला असून प्रतिवादी क्र.२ ने कैफियत दाखल करुन दाव्यातील मागणी स्पष्टपणे नाकारलेली आहे. सदर प्रकरणामध्ये नि.क्र.९१ ला मुद्दे काढण्यात आलेल असून सदर प्रकरण वादीच्या उलटतपासाकरीता प्रलंबित असताना प्रस्तुतचा अर्ज वादींनी दाखल केलेला आहे. त्यामुळे प्रकरण अंशतः सुनावणीकरिता प्रलंबित असल्याचे स्पष्ट होते.

०६. सदर अर्जाद्वारे वादी हया दावा मिळकतीच्या चतुःसीमेमध्ये दुरुस्ती करु इच्छीत आहे. सदर प्रस्तावित दुरुस्तीचे स्वरुप व पक्षकारांमधील वादाचे स्वरुप विचारात घेवून माझे असे मत झाले आहे की, प्रस्तुत दुरुस्ती ही किरकोळ व तांत्रीक स्वरुपाची आहे. त्यामुळे अर्जात नमूद प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपामध्ये बदल होणार नाही. याउलट, सदरचा अर्ज नामंजुर केल्यास प्रकरणामध्ये गुंतागूंत वाढुन प्रकरणाची संख्या वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर दाव्याचे स्वरुप, पक्षकारांमधील वादाचे स्वरुप, प्रस्तावित दुरुस्तीचे स्वरुप व नैसर्गिक न्यायाचे तत्व विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, पक्षकारांमधील वादाचे कायमस्वरुपी निराकरण करण्यासाठी अर्जात नमूद प्रस्तावित दुरुस्ती ही दाव्यामध्ये नमूद असणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मी शेवटी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## **आ दे श**

१. नि.क्र.११२ वरील अर्ज खालीलप्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

२. वादींनी अर्जात नमूद केल्याप्रमाणे दाव्यामध्ये दुरूस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत पुढील तारखेपर्यंत प्रकरणात दाखल करावी.

Digitally signed by Shivakant Machhindra Gourgond
Date: 2021.02.25 18:02:07 +0530

(शिवकांत म. गौरगोंड)

दि.२५.०२.२०२१ सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर निलंगा.